संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com

● वर्ष : ७ वे ● ● अंक : ४२ वा ● ● शनिवार दि. ५ ऑगस्ट २०२३ ● ● किंमत २ रू ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025





# राज्यात १९ हजार ४६० पदांची मेगाभरती

## मंत्री गिरीष महाजन : सर्व जिल्हा परिषद अंतर्गत गट ‘क’ संवर्गातील पदे भरणार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** ग्रामविकास विभागांतर्गत राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमध्ये गट ‘क’ संवर्गातील आरोग्य विभागाची १०० टक्के व इतर विभागांची ८० टक्के रिक्त पदे सरळसेवेने भरण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यातील ३४ जिल्हा परिषदांमधील गट-क मधील ३० संवर्गांतील एकूण १९,४६० इतकी पदे सरळसेवेने भरणेबाबतची जाहिरात ५ ऑगस्ट, २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती ग्रामविकास व पंचायत राज मंत्री गिरीष महाजन यांनी दिली.



मंत्री श्री. महाजन म्हणाले की, माहे मार्च, २०१९ मध्ये सर्व जिल्हा परिषदांकडील गट-क मधील १८ संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. दरम्यान लोकसभा व विधानसभा निवडणूक आचारसंहिता, कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमी व इतर विविध कारणांमुळे परीक्षा होऊ शकली नाही. यानंतर शासनाच्या विविध विभागाद्वारे प्राप्त झालेल्या सूचनांनुसार ग्रामविकास विभागांतर्गत ही मेगाभरती करण्यात येत आहे.

५ ऑगस्ट, २०२३ ते २५ ऑगस्ट, २०२३ पर्यंत उमेदवारांकडून अर्ज स्वीकारण्यात येतील. इच्छुक व पात्र उमेदवारानी ज्या जिल्हा परिषदेमध्ये अर्ज करावयाचा आहे, त्या जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर जाऊन २५ ऑगस्ट, २०२३ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावा लागेल.

जाहिरातींच्या अनुषंगाने रिक्त पदांचा तपशील, पदांकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता, वेतनश्रेणी, वयोमर्यादा, परीक्षा शुल्क, ऑनलाईन अर्ज करण्याची पद्धत, अर्ज करण्याची मुदत व इतर आवश्यक अटी व शर्ती इत्यादी बाबी संबंधित जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर पाहण्यास उपलब्ध होणार असल्याचे मंत्री श्री. महाजन यांनी सांगितले.

पान नं. २ वर

# मिरजेत मुलाचा बापानेच केला खुन

## कटरच्या साह्याने केले शरीराचे तुकडे : घटनेने शहरात खळबळ

**मिरज :** कर्जबाजारी मुलाच्या त्रासाला कंटाळून बापानेच मुलाचा क्रुरपणे खून करून कटरच्या साह्याने त्याच्या शरीराचे तुकडे केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी सकाळी सुभाषनगर हंडीफोड मळा येथे उघडकीस आली. रोहित राजेंद्र हांदिफोड (वय २९, रा. गणेश तलाव पाठीमागे, लक्ष्मी मंदिराजवळ मिरज) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे.

तरुणाच्या मृतदेहाचे दोन तुकडे करून निम्मा भाग गणेश तलावात फेकून देण्यात आला आहे तर निम्मा भाग सुभाषनगर येथे स्वतःच्या प्लॉटमध्ये ठेवण्यात आला आहे. या खून प्रकरणानंतर संशयित बाप राजेंद्र यल्लाप्पा हंदिफोड हा स्वतःहून पोलिसात हजर झाल्यानंतर खुनाची ही घटना उघडकीस आली आहे. बापानेच मुलाची इतकी क्रूरपणे हत्या केल्याच्या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली आहे.



मयत रोहित हांदिफोड

घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, रोहित हंडीफोड हा गणेश तलाव पाठीमागे असलेल्या लक्ष्मी मंदिराजवळ राहण्यास होता. त्यांचा वडिलोपार्जित दूध विक्रीचा व्यवसाय आहे. अधून मधून तो दूध विक्री हे करत होता. मात्र गेल्या काही वर्षांपासून तो कर्जबाजारी बनल्याने घरात नेहमी वादावादी करत असे. यापूर्वी वडिलांसोबत त्याचे भांडण झाले होते. त्यानंतर संबंधित रोहित हंडीफोड याचा खून झाल्याचे उघडकीस आले.

वडील राजेंद्र यांनी मुलगा रोहित याच्या डोक्यात फावडा घालून खून केला. त्यानंतर कटरच्या साह्याने हात पाय आणि मुंडके कापून जवळ असलेल्या गणेश तलावात फेकून दिले. त्यानंतर उर्वरित मृतदेहाचे धड एका पोत्यात गुंडाळून सुभाषनगर येथील स्वतःच्या प्लॉटमध्ये आणून फेकले. असे प्राथमिक तपासातून समोर आले आहे. खुन करून संशयित बाप स्वतः पोलिसात हजर झाल्यानंतर खूनाची ही घटना समोर आली आहे. याबाबत अधिक तपास सुरू आहे.

# अनिल बाबर यांच्या कार्यालयास अमरसिंह देशमुख यांची भेट

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी :** सांगली जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष, भारतीय जनता पक्षाचे खानापूर विधानसभा क्षेत्राचे निवडणूक प्रमुख अमरसिंह देशमुख यांनी विटा येथे भाजपचे मा. नगरसेवक अनिल म. बाबर यांच्या कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी अनिल बाबर यांनी अमरसिंह देशमुख यांचा सत्कार केला.




**विटा : येथील भाजपचे मा. नगरसेवक अनिल.म.बाबर यांच्या कार्यालयास अमरसिंह देशमुख यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी उपस्थित मान्यवर**

यावेळी मा.नगरसेवक किशोर डोंबे, दत्तात्रय तारळेकर, मनोज खारगे, सुधीर बाबर, कुमार लोटके, प्रकाश टेके, हेमंत कुरकुटे, रवि शिंदे, अरूण बालटे मा.जि.प.सदस्य, ऋषिकेश देशमुख माजी सदस्य, कृषि ऊत्पन्न बाजार समिती उपस्थित होते यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# १५ हजारांची लाच घेताना पोलीस नाईक ’लाचलुचपत’च्या जाळ्यात

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सोलापूर :** वाळू चोरीची कारवाई न करण्यासाठी व तहसीलदारांना अहवाल न पाठवण्यासाठी २० हजारांची लाच मागून १५ हजारांची लाच घेताना पोलीस नाईक याला सोलापूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले. दत्तात्रय रामचंद्र कांबळे ( सलगरवस्ती पोलीस स्टेशन, सोलापूर शहर) असे अटक केलेल्या पोलीस नाईकाचे नाव आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, तक्रारदार यांचे मौजे कवठेगाव येथे घराचे बांधकाम सुरू असून बांधकामासाठी लागणारी वाळू तक्रारदार यांनी त्यांच्या भावाच्या घरासमोर रस्त्याच्या कडेला टाकली होती. दि ७ जुलै रोजी आरोपी कांबळे यांनी तक्रारदार यांच्या भावास सदरची वाळू चोरीची आहे. तुमच्याविरुद्ध गुन्हा दाखल करतो, असे म्हणून तक्रारदार यांच्या भावास पोलीस स्टेशनला घेऊन गेले. त्यानंतर सदर प्रकरण मिटवण्यासाठी २० हजार लाचेची मागणी केली. त्यानंतर याची माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला देण्यात आली, त्यानंतर तडजोडी अंती ठरलेली १५०० हजारांची लाच घेताना त्याला ताब्यात घेतले. या प्रकरणी सलगरवस्ती पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई चंद्रकांत कोळी, पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार शिरीषकुमार सोनवणे, प्रमोद पकाले, श्रीराम घुगे, स्वामीराव जाधव, अतुल घाडगे, संतोष नरोटे, राहुल गायकवाड यांनी केली.

# क्रांतीदिनी आटपाडीत मेंढपाळांचा ढोल कैताळ मोर्चा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त आटपाडी येथे मेंढपाळांच्या विविध मागण्यांकरिता भव्य ढोल कैताळ मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्यातील मेंढपाळांच्यावर होणारे वाढते हल्ले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेळी मेंढी महामंडळाची दुरावस्था यासह अन्य मागण्या घेऊन मेंढपाळ आर्मीच्या वतीने आटपाडी बसस्थानक ते तहसीलदार कार्यालय आटपाडी येथे भव्य ढोल कैताळ मोर्चाचे आयोजन दिनांक ९ ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त करण्यात आले असल्याची माहिती मेंढपाळ आर्मीचे कार्याध्यक्ष अंकुश मुढे व विजय वाक्षे यांनी दिली.

राज्य व केंद्र शासन मेंढपाळांची खोट्या भुलथापा मारून शुध्द फसवणूक करत आहे. याला भोळा भाबडा मेंढपाळ बांधव बळी पडत असुन १ हजार कोटी,१० हजार कोटी ह्या घोषणा फसव्या आहेत असेही मेंढपाळ आर्मी चे कार्याध्यक्ष अंकुश मुढे म्हणाले.

> केंद्र व राज्य सरकार भोळ्या भाबड्या मेंढपाळांचा अंत बघत आहे त्यांना १ हजार कोटी, १० हजार कोटी, मेंढपाळांना कधीच द्यायचेच नव्हते, खोट्या घोषणा करून मतांची बेरीज जुळविण्याचा उद्योग राज्यकर्ते करत आहेत, त्यांना धडा शिकविण्यासाठी ९ रोजी होणाऱ्या ढोल कैताळ मोर्चात सहभागी व्हा.
>
> **अंकुश मुढे**
> **कार्याध्यक्ष, मेंढपाळ आर्मी**



मेंढपाळांच्या बाबतीत केंद्र व राज्य सरकारची नियत साफ नाही, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाराष्ट्र शेळी मेंढी विकास महामंडळाला वर्षाला ३००० कोटी भागभांडवल भारत सरकारने द्यावे, मेंढपाळ व मेंढीला विमा संरक्षण मिळावे, हिंसक पशुंपासुन संरक्षणासाठी मेंढपाळांना पिस्तूल परवाना मिळावा, शेळ्या व मेंढ्यांना हमीभाव मिळावा,शेळी मेंढी महामंडळातील कर्मचारी यांची पर्मनंट भरती करावी व त्यांना निवृत्ती वेतन मिळावे, पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या रिक्त जागा त्वरित भराव्यात, धनगरी ओव्या, गजीनृत्य, ढोलवादक यांना कलाकार मानधन मिळावे व अटी शिथिल करण्यात याव्यात. डबई कुरण लांडग्यांसाठी राखीव करण्याचा निर्णय रद्द करण्यात यावा यासह अन्य मागण्या घेऊन मेंढपाळ आर्मी संघटनेच्या वतीने भव्य ढोल कैताळ मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

या मोर्चास महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या सीमाभागातील मेंढपाळ मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असुन मेंढपाळ व धनगर समाज बांधवांनी सहभागी व्हावे असे आवाहन मेंढपाळ नेते विजय वाक्षे व मेंढपाळ आर्मी चे राष्ट्रीय कार्याध्यक्ष अंकुश मुढे यांनी केले आहे.

# दिघंचीत संभाजी भिडेच्या विरोधात घोषणाबाजी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**दिघंची/प्रतिनिधी :** महात्मा गांधी व महात्मा फुले यांच्या बद्दल अपशब्द वापरून त्यांची बदनामी करणाऱ्या शिवप्रतिष्ठानचे संस्थापक संभाजी भिडे यांच्या विरोधात दिघंची ता. आटपाडी, जि. सांगली येथे घोषणाबाजी करून कार्यकर्त्यांनी निषेध व्यक्त केला.



**दिघंची : येथे संभाजी भिडेच्या विरोधात घोषणाबाजी करताना सामाजिक कार्यकर्ते**

यावेळी जनसेवा संघटनेचे नवनाथ रणदिवे म्हणाले, संभाजी भिडे हे महापुरुषांबद्दल बेताल वक्तव्य करत सुटले आहेत. त्यांच्या या वक्तव्याने महापुरुषांचा अपमान होत असून आम्ही तो कदापी ही सहन करणार नाही. त्यामुळे संभाजी भिडे यांनी केलेली वक्तव्ये तपासून त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा.

यावेळी अमित वाघमारे, बळीराम रणदिवे, रवी वाघमारे, मंगेश रणदिवे, अजित रणदिवे, सतीश रणदिवे, ग्रामपंचायत सदस्य किरण वाघमारे, विलास बनसोडे, पोपट वाघमारे यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# निंबवडे जि.प. शाळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**निंबवडे/वार्ताहर :** आटपाडी तालुक्यातील निंबवडे जिल्हा परिषद मॉडेल स्कूल शाळेच्या विद्यार्थ्यांनी डॉ. पतंगराव कदम जिल्हा गुणवत्ता शोध शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले आहे.



**आटपाडी : निंबवडे येथे जिल्हा शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करताना शिक्षण विस्तार अधिकारी जगन्नाथ कोळपे व उपस्थित मान्यवर**

जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा नंबर १ मॉडेल स्कूल निंबवडे शाळेचे दोन विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र झाले आहेत. यामध्ये राहुल साहेबराव बुधावले इयत्ता सातवी व अनुज रावसाहेब देवडकर इयत्ता चौथी हे विद्यार्थी डॉ. पतंगराव कदम जिल्हा गुणवत्ता शोध शिष्यवृत्ती चाचणी परीक्षेत शिष्यवृत्ती धारक झाले आहेत.

शाळा नंबर १ निंबवडे येथे त्यांचा व इयत्ता सातवीचे वर्गशिक्षक महेश इंगवले व अमोल मिसाळ, इयत्ता चौथीचे वर्गशिक्षक मारुती देवडकर यांचा सत्कार जगन्नाथ कोळपे शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती आटपाडी, यशवंत गोडसे केंद्रप्रमुख निंबवडे, अशोक मोटे, मारुती देवडकर मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, पालक यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शाळेतील सहशिक्षक रतिलाल गळवे, कृष्णदेव पिंजारी, गणेश नेहरकर, अमोल मिसाळ, महेश इंगवले, मारुती देवडकर या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. शाळेच्या यशाबद्दल सरपंच नंदाताई देठे, गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय मोरे, शाळा नं.२ चे मुख्याध्यापक भरत कदम व त्यांचा सर्व शिक्षक स्टाफ यांनी शाळेचे, विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले. यावेळी सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.






# संपादकिय

## भाजपला चपराक, इंडिया ला बळ !

'सर्व चोरांचे आडनाव मोदीच का असते?' असे विधान केल्यामुळे अब्रुनुकसानीच्या गुन्ह्यांतर्गत दोषी ठरवून दोन वर्षाच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आलेले काँग्रेसचे राहुल गांधी यांना सर्वोच्च न्यायालयाने दिलासा दिला असून गुजरात उच्च न्यायालयाने सुनावलेल्या शिक्षेला स्थगिती दिली आहे. यामुळे विरोधी पक्षांच्या एकीला म्हणजेच इंडिया ला बळ मिळाले असून सत्ताधारी भारतीय जनता पक्षाला मात्र सणसणीत चपराक न्यायालयाने दिली आहे. राहुल गांधींना खासदारकी बहाल करावी लागणे हा केंद्र सरकार व भाजपसाठी नैतिक पराभव आहे. कारण, संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये राहुल गांधींनी सत्ताधारी भाजप व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अदानी समूहाच्या आर्थिक व्यवहारांवरून लक्ष्य केले होते. त्यामुळे पुन्हा राहुल गांधी पुन्हा लोकसभेत आले तर भाजपवर पर्यायाने मोदींवर पुन्हा थेट हल्लाबोल होण्याची शक्यता आहे. सभागृहामध्ये काँग्रेसच्या व विरोधकांचा 'इंडिया' अधिक आक्रमक होऊ शकतील.

लोकसभा सचिवालयाने तातडीने राहुल गांधी यांची खासदारकी रद्द करण्याचा आदेश काढला होता. त्यांना सरकारी निवासस्थान रिक्त करण्याचे आदेशही देण्यात आले. मात्र, शिक्षेला स्थगिती मिळाल्याने लोकसभा सचिवालयाला राहुल गांधींना खासदारकी बहाल करावी लागेल. इतकेच नव्हे तर सरकारी निवासस्थानाची सुविधाही द्यावी लागेल. लोकसभा सचिवालयाच्या आदेशानंतरही केंद्रीय निवडणूक आयोगाने वायनाडमध्ये तातडीने पोटनिवडणूक घोषित न करण्याचा निर्णय घेऊन सचिवालयाला अप्रत्यक्ष चपराक दिली होती.

न्यायालयाच्या निर्णयानंतर विविध नेत्यांना प्रतिक्रिया दिल्या असल्या तरी यातील तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत केले. या निर्णयामुळे माझा न्यायव्यस्थेवरील विश्वास वाढला आहे, असे स्टॅलिन म्हणाले. त्यामुळे या निकालाने भाजपला चपराक मिळाली असून इंडिया ला मात्र आगामी निवडणुकीमध्ये बळ मिळणार हे निश्चित.

## आदर्श उपक्रमशील, विद्यार्थी प्रिय शिक्षक नागेश चांडोले (सर) वाढदिवस विशेष

'शिक्षक हा जन्मालाच यावा लागतो', याचे मुर्तिमंत उदाहरण म्हणजे चांडोलेवाडी सांगोल्याचे नागेश चांडोले सर. मुख्याध्यापक लोणारवाडी बोंबेवाडी गुरुकुल विद्यालय सांगोला पासुन ३ कि.मी. दुर असलेल्या चांडोलेवाडी सारख्या ग्रामीण भागातील विशेष शिक्षक रत्न म्हणचे चांडोले सर.

शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे ते पिल्यावर सर्वसामान्य माणुसही गुरगुरणार हे सर स्वतः समजुन आहेत पण त्यांनी पाचशे पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना समजावुन सांगितले. अभ्यासाचे नियोजन सातत्य एकाग्रता हे ही विद्यार्थ्यांच्या अंगी बिनवले. शिका! संघटीत व्हा! संघर्ष करा! हे समजावुन सांगुन, 'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात' या उक्तिप्रमाणे सर काय तरी नविन करुन दाखवणार याची सगळ्याला जाणिव होती. सरांचे बालपण व प्राथमिक शिक्षण चांडोलेवाडी येथेच गेले. त्यांच्या आई वडिलांनी लहानपणा पासुनच त्यांना शिस्त, संस्कार, माणुसकी हे गुण अंगभुत बसवले. सरांची पुढील महाविद्यायालयीन शिक्षण व अध्यापनाचे (इ.एव.) सांगोला येथेच झाले. अतिशय बिकट परिस्थितीतुन सातत्याने जिद्दीने संघर्षाने सरांनी शिक्षण पुर्ण केले. शिक्षण घेत असताना सरांनी अनेकदा चमकुन आपले गुण दाखवून दिले.

सरांची शिक्षकी पेशाला सुरुवात खऱ्या अर्थाने श्री शंभु महादेव टेकडी बोंबेवाडी येथुन झाली. नविन निवासी शाळा, परिसर नवखा, लोक नविन, एकटा माणूस, २०-२५ विद्यार्थी संख्या सुरवात, पण सरांनी न डगमगता जिद्दीने जोशाने आपले अध्यापनांचे कार्य चालु ठेवले.



गेली १०-११ वर्षे गुरुकुल शाळेवरती प्रामाणिक पणाने सेवा करून, सरांनी सलग ९ वर्षे दहावीचा निकाल शंभर टक्के लावला आहे. त्याच बरोबर अनेक विद्यार्थी,डॉक्टर, इंजिनिअर, अधिकारी, व्यावसायिक असे अनेक विद्यार्थी बनविले आहेत. त्यांना आपल्या पायावर उभा करुन आदर्श सुसंस्कृत बनविले आहे. सरांचे दैदिप्यमान कार्य बघुन मातोश्री सामाजिक सेवा भावी संस्थेचे दत्तात्रय शेजाळ यांनी सरांना 'आदर्श मुख्याध्यापक' हा पुरस्कार देवून २०१९ साली सन्मानित केले. त्याच बरोबर सरांनी वार्षिक स्नेहसंमेलन, सांस्कृतिक कार्यक्रम, सहल व इतर कार्यक्रम दर्जेदार घेवुन तालुक्यासह जिल्ह्यात शैक्षणिक आनंददायी जोशपुर्ण वातावरण निर्माण केले आहे.

'उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त झाल्याशिवाय थांबू नका,' असा संदेश देणारे स्वामी विवेकानंद यांचे विचारही त्यांनी विद्यार्थ्यांच्या मना-मनात उतरवले. सरांच्या शैक्षणिक कार्यात सरांना अनमोल साथ असती ती त्यांच्या पत्नी मयुरी चांडोले मॅडम यांची, त्या सरांबरोबर सावली प्रमाणे असतात. प्रत्येक घडीला त्यांची शैक्षणिक कार्यात सरांना मदत असते.

माणंस म्हणतात, माणसांने सोन्यासारखं असावं, पण सोने हे तिजोरीत ठेवण्यासाठी अंगावर घालुन मिरवण्यासाठी इतरांना दाखविण्यासाठी असतं. मी म्हणतो माणसांने 'परिसा' सारखं असावं, ज्यांच्या संगतीत जावं त्यांच सोनं करावं, असे परिस व्यक्तिमत्व म्हणजे सन्मानीय नागेश चांडोले सर यांना प्रकटदिनाच्या मनःपुर्वक आभाळभर शुभेच्छा ! गणरायाच्या कृपेने आपली शैक्षणिक ख्याती अशीच वाढत राहो, आपणांस सुख समाधान आरोग्य व दिर्घाआयुष्य लाभो... हीच श्री चरणी प्रार्थना. नागेश चांडोले सरांना पुनःश्च एकदा उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छ !



शब्दांकन
दैवत काळेल, सर

# राज्यात १९ हजार ४६० पदांची मेगाभरती

**पान नं. १ वरुन : सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच कालावधीमध्ये पदनिहाय संगणकीकृत परीक्षा होणार**

राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमध्ये शक्यतो एकाच कालावधीमध्ये पदनिहाय संगणकीकृत परीक्षा होणार असल्यामुळे उमेदवाराने एकाच पदाकरिता अनावश्यक, जास्त जिल्हा परिषदांमध्ये अर्ज करू नये. असे केल्यास अर्ज शुल्कापोटी उमेदवारांचा अनावश्यक खर्च होण्याची शक्यता आहे. भरती प्रक्रियेसाठी ऑनलाईन परीक्षेचे प्रवेशपत्र हे संगणकीकृत यंत्रणेद्वारे तयार होणार असल्यामुळे उमेदवाराने एका संवर्गासाठी एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांना अर्ज केले असल्यास व परीक्षा प्रवेश पत्रानुसार उमेदवाराला एकाच वेळेस अन्य ठिकाणी परीक्षेचा क्रमांक आल्यास व त्याठिकाणी परीक्षा देता न आल्यास त्यास जिल्हा परिषद जबाबदार राहणार नाही.

**परीक्षा प्रक्रिया पारदर्शकता : प्रक्रिया (IBPS) कंपनीमार्फत**

परीक्षेची संपूर्ण प्रक्रिया आयबीपीएस (IBPS) कंपनीमार्फत करण्यात येत आहे. त्यामुळे या परीक्षेमध्ये अत्यंत पारदर्शकता राहणार आहे. त्यामुळे कोणत्याही आमिषास कोणत्याही उमेदवाराने बळी पडू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रधान सचिव (ग्रामविकास विभाग) यांच्या माध्यमातून वारंवार आयबीपीएस (खइझड) तसेच जिल्हा परिषद अधिकाऱ्यांसोबत बैठका घेऊन हा प्रश्न मार्गी लावलेला आहे.

ज्यांनी मार्च, २०१९ मध्ये अर्ज केलेला होता, वयाधिक्य झाल्याने ते परीक्षेस बसण्यास पात्र ज्या उमेदवारांनी मार्च, २०१९ मधील जिल्हा परिषद जाहिरातीकरीता अर्ज केलेला होता व वयाधिक्य झाल्याने ते परीक्षेस बसण्यास अपात्र होत आहेत, अशा उमेदवारांना ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत जिल्हा परिषद सेवेत सरळसेवेने नियुक्तीबाबत प्रसिध्द होणाऱ्या सर्व जाहिरातींकरीता पात्र करण्यात आले आहे.

**कमाल वयोमर्यादेत २ वर्षे इतकी शिथिलता**

ज्या उमेदवारांनी मार्च, २०१९ परीक्षेकरीता अर्ज केलेला नाही, त्यांनाही सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयास अनुसरुन कमाल वयोमर्यादेत २ वर्ष इतकी शिथिलता देण्यात आलेली असून ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत जिल्हा परिषद सेवेत सरळसेवेने नियुक्तीबाबत प्रसिध्द होणाऱ्या सर्व जाहिरातींकरीता पात्र करण्यात आले आहे.

# लोकशाहीचा विजय झाला : मल्लिकार्जुन खरगे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहूल गांधी यांना सुप्रीम कोर्टाकडून मोठा दिलासा मिळाला. गुजरात हायकोर्टाने दिलेल्या दोन वर्षाच्या शिक्षेला सुप्रीम कोर्टाने स्थगिती दिली.राहुल गांधी यांना दिलेल्या शिक्षेला कुठलेही पुरेसे कारण नसल्याचे म्हणत सुप्रीम कोर्टानं शिक्षेला स्थगिती देण्याचा निर्णय दिलाय. हा निर्णय देताना सार्वजनिक जीवनात वावरताना भान ठेऊन वक्तव्य केली पाहीजेत असेही सुप्रीम कोर्टाने राहूल गांधी यांना सुनावलय.कोर्टाच्या निर्णयानंतर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि राहुल गांधी यांनी माध्यमांना प्रतीक्रिया दिली. यावेळी मोदी सरकारवर खरगे यांनी निशाणा साधला.



मल्लिकार्जुन खरगे

आज लोकशाहीचा विजय झाला. हा विजय राहुल गांधी यांचा एकट्याचा नसून, जनतेचा आहे. आज आनंदाचा दिवस आहे. लोकशाहीचा, संविधानाचा विजय झाला सत्यमेव जयते! याचा फायदा देशाला झाला. सत्यासाठी, देशाच्या हितासाठी, युवकांसाठी, महागाईसाठी राहुल गांधी यांनी कन्याकुमारीपासून ते काश्मीर पर्यंत चालत सगळ्यांची भेट घेतली, त्यांच्या समस्या जाणून घेतल्या त्यांचाच हा आशीर्वाद आहे. राहुल गांधी यांची खासदारकी घालवण्यासाठी २४ तास लागले. आता खासदारकी पर मिळण्यासाठी किती वेळ लागतो हे पाहावे लागेल. आम्ही वाट पाहू, अशी प्रतिक्रिया काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी दिली.

यावेळी केंद्र सरकारवर टीका करताना ते म्हणाले की, मोदी सरकारला आपण चूक केलीय का अस वाटत असेल. यावर मी आता भाष्य करणार नाही. हा जनतेचा विजय आहे. आज लोकशाहीचा विजय झाला. सत्यमेव जयते असेही ते म्हणाले.

# वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांत मृत्यू झाल्यास २५ लाखांचे अर्थसाह्य

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** वन्यप्राण्यांच्या, हल्ल्यामुळे होणाऱ्या मनुष्य मृत्यू, अपंगत्व, गंभीर जखमी आणि किरकोळ जखमी झाल्यास द्यावयाच्या अर्थसाह्यात वाढ करण्यात आली आहे. व्यक्ती मृत्यू पावल्यास त्याच्या वारसांना २५ लाख रुपये, व्यक्तीला गंभीर अपंगत्व आल्यास ७ लाख ५० हजार रुपये, व्यक्ती गंभीररित्या जखमी झाल्यास ५ लाख रुपये आणि किरकोळ जखमी झाल्यास त्याला औषधोपचारासाठी खर्च देण्यात येणार आहे. यासंदर्भातील शासन निर्णय महसूल व वन विभागाने ३ ऑगस्ट, २०२३ रोजी निर्गमित केला आहे, अशी माहिती वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

सध्याच्या आर्थिक तरतुदीत वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू, कायमस्वरुपी अपंगत्व, गंभीर जखमी व किरकोळ जखमी व्यक्तीला द्यावयाची आर्थिक मदत त्या मानाने कमी असल्याबाबत व त्यामध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.



सुधीर मुनगंटीवार

लोकप्रतिनिधींकडून आर्थिक साहाय्यामध्ये वाढ करण्याबाबत मागणी होत होती. त्या अनुषंगाने मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी या आर्थिक मदतीत वाढ करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले होते. दिनांक ०३ रोजी त्यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला.

मात्र, खासगी रुग्णालयात औषधोपचार करणे अगत्याचे असल्यास त्याची मर्यादा रुपये ५० हजार प्रति व्यक्ती, अशी राहील. शक्यतो औषधोपचार शासकीय किंवा जिल्हा रुग्णालयात करावे, असे नमूद करण्यात आले आहे. वाघ, बिबट्या, अस्वल, गवा (बायसन), रानडुक्कर, लांडगा, तरस, कोल्हा, मगर, हत्ती, रानकुत्रे (ढोल), रोही (निलगाय) व माकड / वानर यांच्या हल्ल्यात मनुष्य हानी झाल्यास मृत्यू, कायम अपंगत्व, गंभीर जखमी, किरकोळ जखमी या वर्गवारीनुसार अर्थसहाय्य संबंधितांना अदा करण्यात येते.

वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात अनेक वेळा मनुष्य मृत्यू होत नाही, परंतु गंभीर किंवा किरकोळ जखमी होतात. जखमी व्यक्तीला योग्य व तातडीचे उपचार मिळावेत व ते प्राथमिकतेने शासकीय रुग्णालयात मिळावेत याबाबत प्रशासनाकडून सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतात व मानवी जीव वाचविण्यात येतो. काही वेळा उपयुक्त संसाधन युक्त शासकीय रुग्णालय जवळ उपलब्ध नसते व अशा प्रसंगी जखमी व्यक्तीला खासगी रुग्णालयात जाऊन तातडीचा उपचार करावा लागतो.

वन्यप्राणी हल्ल्यामुळे मृत व्यक्तीच्या वारसांना देण्यात येणाऱ्या रकमेपैकी रुपये १० लाख देय असलेल्या व्यक्तीला तत्काळ धनादेशाद्वारे व उर्वरित रक्कम रुपये १० लाख पाच वर्षांकरिता मुदत ठेव म्हणून ठेवावे आणि उर्वरित पाच लाख रुपये १० वर्षांकरिता मुदत ठेवीत ठेवावेत. दहा वर्षांनंतर वारसांना पूर्ण रक्कम मिळेल, असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.


||श्री महालक्ष्मी प्रसन्न|| ||श्री खंडोबा प्रसन्न||
श्री.विनेश बनसोडे Mo.7276137517 9631755757
जय बाळूमामा
टुर्स & ट्रॅव्हल्स
ERTIGA गाडी योग्य दरात भाड्याने मिळेल.
संपर्क- रक्षक गुरुदत्त RO वॉटर





माणदेश एक्सप्रेस
व्यवसायिक जाहिरात योजना
आपल्या व्यवसायाचा प्रचार, प्रसार करण्यासाठी दैनिक 'माणदेश एक्सप्रेस' ने आणली आहे अल्प दरात जाहिरात योजना आहे.
आटपाडी तालुक्यासह सांगली तसेच माणदेशातील अग्रगण्य दैनिक माणदेश एक्सप्रेस च्या माध्यमातुन आपली जाहिरात ५० हजार लोकपर्यंत पोहचवा.
10 X 5 cm १०००/- रुपयात महिनाभर
10 X 10 cm २०००/- रुपयात महिनाभर
20 X 7 cm ३०००/- रुपयात महिनाभर
20 X 13 cm ४०००/- रुपयात महिनाभर
टीप : आतील पानासाठी हे दर १० टक्के कमी आहेत
याशिवाय विशेष स्किम, विविध योजांची माहिती देणाऱ्या बातम्यांना प्रसिद्धी दिली जाईल.
आजच संपर्क करा
९५९५०४७६७६, ९५०३६३८६८६



Email - netra7676@gmail.com
डिजीटल जम्बो
नेत्रा कलर झेरॉक्स्
७/१२ उतारे, सर्व शासकीय फॉर्म, मराठी टायपिंग
धिरज, 9503 63 8686 दिपक, 9595 04 7676 गाळा नं. ११


दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायक्षेत्र)

दैनिक माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस






## टपाल विभागातर्फे आयोजित पत्रलेखन स्पर्धेत सहभाग घेण्याचे आवाहन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** सध्याच्या डिजीटल युगात पत्र लेखन कमी होत चालले आहे. शालेय विद्यार्थ्यांना पत्र लिखाणामध्ये रुची निर्माण व्हावी, यासाठी भारतीय टपाल विभागातर्फे राष्ट्रीय स्तरावरील पत्रलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये भाग घ्यावा, असे आवाहन प्रवर अधीक्षक डाकघर सांगली यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

पत्रकात म्हटले आहे, पत्रलेखन स्पर्धेमुळे पत्रलेखन कलेबरोबरच देशभरातील व्यक्तिंना त्यांचे विचार, भावना आणि कल्पना अर्थपूर्ण व मनापासून व्यक्त करण्याची संधी आहे. स्पर्धेचा विषय, अटी व नियम पुढीलप्रमाणे. विषय – ऊळसळींरश्र खपवळर षी छ्शु खपवळर या विषयावर स्पर्धकाने पत्र लिहायचे आहे. पात्रता – कोणीही व्यक्ति यामध्ये भाग घेवू शकते. भाषा – मराठी / इंग्रजी / हिन्दी. या स्पर्धेसाठी फक्त अंतर्देशीय पत्र /पोस्टाचा लखोटा/ साधा लखोटा (आवश्यक तिकीटे लावून) यांचा वापर करावयाचा आहे. या स्पर्धा अंतर्देशीय पत्र व लखोटा अशा दोन प्रकारात आहे. अंतर्देशीय पत्र किंवा ए-४ साईज कागदावरच पत्र लिहावयाचे आहे. शब्दांची मर्यादा – अंतर्देशीय पत्र ५०० शब्द आणि ए-४ साईज कागद १००० शब्द. ही स्पर्धा वय १८ वर्षापर्यंत व वय १८ वर्षावरील या दोन गटामध्ये असणार आहे. मी असा दाखला देतो / देते की, दि. ०१.०१.२३ रोजी मी १८ वर्षावरील / वर्षाखालील गटात समाविष्ट होते /होतो असा दाखला सदर पत्रावर लिहिणे आवश्यक आहे. पत्र पाठविण्याची अंतिम तारीख ३१ ऑक्टोबर २०२३ आहे. पत्र पाठविण्यासाठीचा पत्ता – मुख्य पोस्टमास्टर जनरल, महाराष्ट्र सर्कल, मुंबई ४०००01.

पहिल्या तीन क्रमांकाना सर्कल स्तरावर पुढील प्रमाणे बक्षिसे दिली जाणार आहेत. सर्कल (राज्य) स्तरावर प्रथम क्रमांक २५ हजार रूपये, व्दितीय क्रमांक १० हजार रूपये व तृतीय क्रमांकास ५ हजार रुपये असे बक्षीस प्रत्येक प्रकारात आहे. सर्कल स्तरावरील तीन बक्षीसपात्र पत्रे राष्ट्रीय स्तरावर पाठविली जाणार आहेत आणि तेथे सर्व सर्कलमधून आलेल्या पत्रांमधून राष्ट्रीय स्तरावर तीन नंबर काढण्यात येणार आहेत. राष्ट्रीय (अखिल भारतीय) स्तरावर प्रथम क्रमांक ५० हजार रूपये, व्दितीय क्रमांक २५ हजार रूपये व तृतीय क्रमांकास १० हजार रुपये असे बक्षीस प्रत्येक प्रकारात आहे.

## शासकीय रुग्णालयांचे अद्ययावतीकरण करणार : उदय सामंत

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राज्याच्या कानाकोपऱ्यातून मुंबईमधील शासकीय रुग्णालयांत उपचार घेण्यासाठी नागरिक येतात. या रुग्णालयांमध्ये रुग्णांना अधिकाधिक आणि अद्ययावत सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी शासन प्रयत्नशील आहे. आगामी काळात शासकीय रुग्णालयांचे अद्ययावतीकरण करण्यात येईल, असे मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत सांगितले. सदस्य अमिन पटेल यांनी अर्धा तास चर्चेदरम्यान मुंबईतील शासकीय रुग्णालयातील सोयी-सुविधाबाबत प्रश्न उपस्थित केला होता.

मंत्री श्री. सामंत म्हणाले की, मुंबई महापालिकेच्या रुग्णालयातील सोयी-सुविधांबाबत मुंबई महानगरपालिका आयुक्तांसोबत १५ दिवसात बैठक घेण्यात येईल. या रुग्णालयातील सोयी सुविधांवर केलेल्या खर्चाचीही उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल.तसेच धर्मादाय ट्रस्ट अंतर्गत येणाऱ्या रुग्णालयांसाठी जी नियमावली तयार करण्यात आली आहे. या नियमावलीची अंमलबजावणी होते की नाही, हे तपासण्यासाठी मोहीम हाती घेण्यात येईल. ग्रामीण भागातून मुंबईमध्ये उपचारांसाठी येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांची राहण्याची समस्या सोडवण्यासाठीही सकारात्मक विचार करण्यात येईल, असे मंत्री श्री. सामंत यांनी यावेळी सांगितले.यावेळी झालेल्या चर्चेत ड.आशिष शेलार, मनीषा चौधरी यांनी सहभाग घेतला.

# वेळापुरात महसूलचा जनसंवाद उपक्रम संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**माळशिरस/विष्णू भोंगळे :** महसूल विभागामार्फत एक ऑगस्ट ते सात ऑगस्ट दरम्यान सुरू झालेल्या महसूल सप्ताह उपक्रमांतर्गत जनसंवादातून जास्तीत जास्त नागरिकांनी आपली प्रलंबित प्रकरणे व अपिले निकालात काढून घ्यावीत असे आवाहन रोजगार हमी योजनेच्या पुणे विभागीय उपायुक्त वैशाली उंटवाल यांनी केले.

त्या वेळापूर आणि पिलिव महसुल मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या लोकाभिमुख जनसंवाद उपक्रमांतर्गत वेळापूर येथील आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या.यावेळी मंचावर रोजगार हमी योजनेच्या उपजिल्हाधिकारी चारुशीला देशमुख, उपसंचालक कृषी विभाग मोरे, अकलूज उपविभागीय अधिकारी नामदेव टिळेकर, कार्यकारी अभियंता हबू, तहसीलदार सुरेश




**वेळापूर : येथील इंद्रनील कार्यालयात संपन्न महसूल सप्ताह उपक्रमांतर्गत जनसंवाद उपक्रमात सहभागी अधिकारी आणि मान्यवर**

शेजुळ, उपविभागीय अभियंता पाठक,वेळापूरचे सरपंच रजनीश बनसोडे, गटविकास अधिकारी विनायक गुळवे,नायब तहसीलदार अमोल कदम, वेळापूरचे मंडल अधिकारी संदीप चव्हाण उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वातंत्र्य सैनिक व माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नॉन क्रिमिलियर, जातीचे दाखले, उत्पन्नाचे दाखले, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे दाखले, सातबारा व फेरफार उतारे लाभार्थींना प्रदान करण्यात आले. तसेच आधार तक्रार निवारण, शालेय विद्यार्थ्यांचे आधार अपडेटेशन, नवीन मतदार नोंदणी आदी प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात आली.

उपजिल्हाधिकारी चारुशीला देशमुख यांनी मनरेगाची माहिती सांगितली. प्रांताधिकारी नामदेव टिळेकर यांनी महसूल सप्ताहात दस्तऐवज अद्यावत करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमासाठी वेळापूरचे ग्रामविकास अधिकारी कैलास सुरवसे, तलाठी राघवेंद्र तोरके, पिलीव, वेळापूर मंडल मधील सर्व तलाठी,कर्मचारी ई-महा सेवा केंद्राचे संचालक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार सुरेश शेजुळ यांनी केले तर आभार गटविकास अधिकारी विनायक गुळवे यांनी मानले. सूत्रसंचालन शिक्षक लक्ष्मीकांत कुलकर्णी यांनी केले.

# इंदापूर विहिर दुर्घटनेतील मजुरांचे मृतदेह सापडले

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**इंदापूर :** इंदापुरात विहिरीचे बांधकाम करताना रिंग पडून ढिगाऱ्याखाली गाडले गेलेल्या चारही मजुरांचे मृतदेह सापडले आहेत. या मजुरांच्या शोधासाठी एनडीआरएफकडून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू होते. तब्बल ६५ तासानंतर पहिला मृतदेह एनडीआरएफ पथकाच्या हाती आला. त्यानंतर २ तासांनी आणखी दोन मृतदेह सापडले. तर ७० तासानंतर चौथा मृतदेह सापडला.

मंगळवारी रात्री ९ च्या सुमारास इंदापूर तालुक्यातील म्हसोबावाडीत विहिरीचे काम करताना रिंग ढासळल्याने सोमनाथ लक्ष्मण गायकवाड (वय ३२), जावेद अकबर मुलाणी (वय ३०), परशुराम चव्हाण (वय ३०), मनोज मारुती चव्हाण (वय ४०) हे चार मजूर ढिगाऱ्याखाली गाडले गेले होते.

या मजुरांच्या शोधासाठी एनडीआरएफकडून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू होते. स्थानिक प्रशासनाच्या मदतीने एनडीआरएफचे पथक घटनास्थळी तळ



**इंदापूर : याच विहिरीचे बांधकाम करताना रिंग पडून ढिगाऱ्याखाली दबून चार मजुरांचा मृत्यू झाला**

ठोकून होते. ही विहीर जवळपास १०० फूट खोल आणि १२०० फूट व्यास असलेली होती. ६ पोकलेन मशिनच्या साह्याने विहिरीच्या बाजूचा मातीचा ढिगारा हटविण्यात येत होता. अखेर आज सलग चौथ्या दिवशी हे मृतदेह एनडीआरएफ पथकाच्या हाती लागले. त्यानंतर ही शोधमोहिम थांबविण्यात आली. हे सर्व मजूर इंदापूर तालुक्यातील बेलवाडी येथील रहिवाशी होते.

दरम्यान, संबंधित विहिरीचे बांधकाम बेकायदेशीर असून, या मालकाने चार कुटुंबांचा जीव धोक्यात घातला. अशा लोकांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी बेलवाडीच्या महिला सरपंच मयुरी जामदार आणि नागरिकांनी केली आहे.

# संभाजी भिडेंना तात्काळ अटक करा

### पुरोगामी संघटनांची मागणी : इस्लामपुरात मोर्चा



**इस्लामपुर : संभाजी भिडेंना तात्काळ अटक करा या मागणी साठी इस्लामपुर येथे पुरोगामी संघटनांची मोर्चा काढला**

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**इस्लामपूर :** शिवप्रतिष्ठानचे संस्थापक संभाजी भिडे यांनी राष्ट्रपुरूष महात्मा गांधी यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्याचा पुरोगामी संघटनांनी मोर्चा काढून निषेध नोंदविला. भिडे यांच्यावर गुन्हा नोंद करुन त्यांना तात्काळ अटक करा अशी मागणी यावेळी करण्यात आली.

संभाजी भिडे यांनी महात्मा गांधी, राष्ट्रगीत आणि तिरंगा ध्वज यांच्याबाबत अवमानकारक विधाने केली आहेत. भिडे यांच्या या वक्तव्याचा निषेध करण्यासाठी संभाजी ब्रिगेड, विद्रोही चळवळ, शिवशंभो प्रतिष्ठान, मराठा सेवा संघ, छावा मराठा युवा महासंघ, वंचित बहुजन आघाडी, राष्ट्रवादी काँग्रेस, दलित महासंघ, महात्मा फुले विचार मंच, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, भारतीय क्रांति दल यांनी बंद पुकारला होता.

संभाजी भिडे यांच्या निषेधार्थ पंचायत समिती येथून क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन निषेध मोर्चाला सुरुवात झाली. येथील तहसील कार्यालय चौकात मोर्चाचे सभेत रुपांतर झाले. त्यानंतर तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

यावेळी, बोलताना राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष शहाजी पाटील म्हणाले, राज्यात सातत्याने राष्ट्रपुरुषांच्या अवमानाचे प्रकार घडत आहेत. मात्र तरीही राज्य सरकार काहीच कारवाई करीत नाही. त्यामुळे सरकारचेच अशा लोकांना पाठबळ आहे की काय अशी धारणा जनतेची झाली असल्याचे म्हणाले.

यावेळी बळीराजा शेतकरी संघटनेचे बी.जी. पाटील, दिग्विजय पाटील, काॅ. धनाजी गुरव, शंकर महापुरे, उमेश कुरळपकर, उमेश शेवाळे, विजय महाडीक, संजय बनसोडे, डाॅ.अमित सुर्यवंशी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजनेच्या लाभासाठी मुदतवाढ

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** पशुसंवर्धन विभागामार्फत राज्यात गोवर्धन गोवंश सेवा केंद्र ही योजना नविन स्वरूपात राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत पात्र संस्थांकडून अर्ज स्वीकारण्यास दि. १८ ऑगस्ट २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. अजयनाथ थोरे यांनी दिली.

या योजनेंतर्गत राज्यातील मुंबई व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे तसेच दि. २६ एप्रिल २०१७ च्या शासन निर्णयातील ज्या ३२ तालुक्यातील गोशाळांना अनुदान देण्यात आलेले आहे असे तालुके वगळून ३४ जिल्ह्यातील प्रति तालुका १ याप्रमाणे ३२४ तालुक्यासाठी ही योजना राबविण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यास अनुसरून सन २०२३-२४ या वर्षासाठी ३२४ तालुक्यामधून सुधारित गोवंश गोवर्धन सेवा केंद्र या योजनेसाठी पात्र गोशाळांकडून नव्याने अर्ज मागविण्यात आले आहेत.

या योजनेंतर्गत लाभार्थी गोशाळांची निवड मधील वेळापत्रकामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे. पात्र संस्थांकडून अर्ज स्वीकारणे २० जुलै ते १८ ऑगस्ट २०२३, जिलहास्तरावर छाननी करणे १८ ते ३१ ऑगस्ट २०२३, प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन यांच्याकडे प्रस्ताव सादर करणे ३१ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२३, प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांच्या स्तरावर छाननी करणे १५ ते ३० सप्टेंबर २०२३. आयुक्त पशुसंवर्धन कार्यालयास प्रस्ताव सादर करणे ३० सप्टेंबर ते ६ ऑक्टोबर २०२३, आयुक्त पशुसंवर्धन कार्यालय स्तरावर छाननी करणे ६ ते ३१ ऑक्टोबर २०२३ व प्रस्ताव शासनास सादर करणे ३१ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर २०२३.

याबाबत काही शंका असल्यास संबंधित तालुक्यातील सहाय्यक आयुक्त व पशुधन विकास अधिकारी विस्तार यांचे मार्गदर्शन घ्यावे, असे आवाहनही डॉ. थोरे यांनी केले आहे.




# समतादूतांचे शासन सेवेत समायोजन कधी होणार?

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही तालुकास्तरावर सामाजिक न्याय विभाग यांचे कुठल्याही प्रकारचे कार्यालय कार्यरत नसुन अनुसूचित जातीच्या लोकांना कोणत्याही योजनांचे लाभ घ्यायचे असल्यास त्यांना जिल्हास्तरावर असणाऱ्या सहाय्यक आयुक्त कार्यालय, जिल्हा परिषद समाजकल्याण कार्यालय येथे हेलपाटे मारावे लागते. तेथेही योग्य प्रकारचे मार्गदर्शन करण्यात येत नसल्याने मोठ्या प्रमाणात नागरिक योजनांपासून वंचित राहत आहेत व अनेक योजनांचे बजेट यामुळे दरवर्षी अखर्चित राहून परत जात आहे.

मागील आठ वर्षापासून बार्टीच्या माध्यमातून अनुभवी समतादूत मनुष्यबळ समाजकल्याण विभागाच्या योजना गाव व तालुकास्तरावर प्रभावीपणे राबवण्याचे काम करत आहे. परंतु समतादूत यांना गरजू लाभार्थी यांना प्रत्यक्ष लाभ देण्याचे अधिकार नसल्यामुळे समतादूतांचे एक प्रकारे हाथ बांधलेले आहेत. समतादूत यांचे समाजकल्याण विभागात समायोजन करून समाजकल्याण विभागाचे कार्यालय तालुकास्तरावर सुरू करण्यात यावे यासाठी समतादूतांनी वेळोवेळी शासन दरबारी, मंत्रालयात, निवेदनाद्वारे मागणी सादर केली होती. समतादूतांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे मंत्रालय कक्ष अधिकारी प्र.वि. देशमुख यांनी २७ डिसेंबर २०२२ रोजी महासंचालक बार्टी यांना समतादूत यांचे समाजकल्याण विभागामध्ये शासन सेवेत समायोजन करण्याबाबत स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याचे पत्र दिले होते.

त्यानुसार बार्टी मुख्यालयाद्वारे दिनांक १८ मे २०२३ रोजी प्र.वि.देशमुख कक्ष अधिकारी मंत्रालय मुंबई यांना समतादूत यांचे समाजकल्याण विभागामध्ये मध्ये समायोजन करण्याबाबत ११४ पाणी स्वयंस्पष्ट सकारात्मक अहवाल शासनास सादर केलेला आहे.व समतादूत यांना समाजकल्याण विभागामध्ये शासन सेवेत समायोजन केल्यास त्याचा लाभ अनुसूचित जातीच्या लोकांना होईल हे अहवालामध्ये स्पष्ट नमूद करण्यात आलेले आहे.

परंतु अद्यापही सदरील अहवाल मंत्रालय स्तरावर प्रलंबित ठेवण्यात आलेला असून तालुकास्तरावर समाजकल्याण विभागाचे कार्यालय व समतादूत यांचे शासन सेवेमध्ये समायोजन याबाबत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. सामाजिक न्याय खाते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे असून मुख्यमंत्री साहेबांनी अनुभवी समतादूत यांचे शासन सेवेत समायोजन करून तालुकास्तरावर समाजकल्याण विभागाचे कार्यालय सुरू करावे व शासन आपल्या दारी संकल्पना खऱ्या अर्थाने पुर्ण करावी ही मागणी समतादूत व तळागाळातील नागरिकांच्या वतीने करण्यात आलेली आहे.

# मेरी माटी मेरा देश अभियानात नागरिकांनी सहभाग घ्यावा : जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव वर्षाचा उपक्रम संपन्न होत असतानाच केंद्र सरकारने मेरी माटी मेरा देश या नवीन उपक्रमाची घोषणा केली आहे. हे अभियान सांगली जिल्ह्यामध्ये यशस्वीपणे पार पाडण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, युवक मंडळ, महिला बचत गट, सर्व नागरिकांनी या अभियानात उत्स्फूर्तपणे सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी केले आहे.

या अभियानांतर्गत घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची माहिती, फोटो, सेल्फी हे https://yuva.gov.in/merišmaatišmerašdesh या पोर्टलवर नेमण्यात आलेल्या नोडल अधिकारी यांच्याकडून अपलोड करण्यात येणार आहेत. व्यक्तिगत स्वरूपात सुध्दा यामध्ये फोटो, सेल्फी अपलोड करता येणार आहेत. नागरिकांनी या अभियानामध्ये जास्तीत जास्त सहभाग घेवून त्यांची माहिती, फोटो, सेल्फी अपलोड करावी, असे आवाहनही जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी केले आहे.


डॉ. राजा दयानिधी

सध्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव मोठ्या दिमाखात साजरा केला जात आहे. १५ ऑगस्ट २०२३ रोजी या महोत्सवाची सांगता होणार आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आजपर्यंत राज्यामध्ये व सांगली जिल्ह्यामध्येही अनेक उपक्रम साजरे करण्यात आले आहेत. मेरी माटी मेरा देश या उपक्रमानुसार प्रत्येक राज्यामध्ये आपल्या मातीविषयी जनजागृती, प्रेम आणि साक्षरता निर्माण व्हावी याबाबत अभियान घेणे अपेक्षित आहे. हे उपक्रम ९ ते १४ ऑगस्ट २०२३ या दरम्यान घेण्यात येणार आहेत. या उपक्रमांतर्गत अमृत सरोवर / जल स्त्रोताशेजारी शिलाफलकम उभारणी, पंच प्रण शपथ व सेल्फी, वसुधा वंदन, वीरों का नमन व ध्वजारोहण व राष्ट्रगान असे कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. प्रत्येक राज्यामध्ये आपल्या मातीविषयी जनजागृती, प्रेम आणि साक्षरता निर्माण व्हावी, वीर योध्दांच्या समर्पणाचे स्मरण करणे याकरिता विशेष अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानात ग्रामपंचायत स्तरापासून ते महानगरपालिकेपर्यंत सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग आहे.

या उपक्रमांतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीच्या ठिकाणी अमृतसरोवर, जलस्त्रोताशेजारी एक शिलाफलक उभारण्यात येणार असून यामध्ये स्थानिक शहीद वीरांची नावे लिहण्यात येतील. प्रत्येक ग्रामपंचायतीच्या ठिकाणी एक अमृत वाटिका तयार करण्यात येणार आहे. मेरी माटी मेरा देश या उपक्रमांतर्गत सर्व शहर, गावामधील माती प्रत्येक तालुकास्तरावर एका कलशामध्ये संकलित करून ते कलश जिल्हास्तरावर आणण्यात येतील व सदर मातीचे कलश दि. २७ ते २९ ऑगस्ट २०२३ या दरम्यान प्रधानमंत्री महोदयांच्या कार्यक्रमासाठी दिल्ली येथे नेहरू युवा केंद्र युवक कल्याण विभाग यांच्या युवकामार्फत घेऊन जाण्यात येतील.

हे अभियान जिल्ह्यामध्ये यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठित करण्यात आली आहे. तसेच तालुकास्तरावर तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित करण्यात आली आहे.

जिल्हास्तरावर तीन नोडल अधिकारी नेमण्यात आलेले असून प्रत्येक नगरपालिका/नगरपंचायत व पंचायत क्षेत्रसाठीही एक नोडल अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे.

## पानपेढीतून गुटखा, अंमली पदार्थांची विक्री केल्यास कारवाई

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** अन्न व्यावसायिक, पानशॉप धारकांनी त्यांच्या पेढीमधून कोणत्याही प्रकारच्या प्रतिबंधीत अन्नपदार्थांची विक्री, उत्पादन, वितरण, साठा किंवा वाहतूक करू नये. कोणताही व्यावसायिक प्रतिबंधीत अन्न पदार्थांचा व्यापार करताना आढळल्यास त्यांच्याविरूध्द अन्न सुरक्षा व मानके कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी. कोणत्याही पानशॉपमधून नशेच्या किंवा इतर अंमली पदार्थांची विक्री केली जाणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त (अन्न) नि. सु. मसारे यांनी केले आहे.



अन्न सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांना अन्न सुरक्षा व मानके कायद्यामधील कलम ३० (२) (अ) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांनुसार सार्वजनिक आरोग्याच्या हिताच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्यामध्ये गुटखा, पानमसाला, सुगंधीत तंबाखू, सुगंधीत सुपारी यांच्या उत्पादन, वितरण, विक्री, साठवणूक व वाहतूक करण्यास शासन अधिसूचना दि. १८ जुलै २०२३ अन्वये पुढील एक वर्षाकरिता प्रतिबंध केला असल्याचे श्री. मसारे यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.

## महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी व्हा : ज.बा. करीम

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज मध्ये सर्व शासकीय व खाजगी विद्यापीठांच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व शैक्षणिक संस्था तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी शैक्षणिक संस्थेतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची नोंदणी करुन सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त ज.बा.करीम यांनी केले आहे.

राज्यातील नाविन्यपूर्ण संकल्पना आणि नवउद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्टअप धोरण जाहीर करण्यात आले आहे. या धोरणाच्या माध्यमातून राज्यामध्ये स्टार्टअप परिसंस्था बळकट करण्याकरिता, इनक्युबेटर्सची स्थापना व विस्तार, गुणवत्ता परीक्षण व बौध्दिक संपदा हक्कासाठी अर्थसहाय्य, ग्रँड चॅलेंज, स्टार्टअप विक यांसारख्या अनेक कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी,मुंबई यांचेमार्फत केले जाते. राज्यातील विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनाना मुर्त स्वरुप देवून महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थी नवउद्योजक व त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांचा शोध घेवून त्यांना आवश्यक व्यासपीठ उपलब्ध करुन देणे, नवउद्योजकांना प्रोत्साहन, तज्ञ मार्गदर्शन, निधी व आवश्यक पाठबळ पुरविणे तसेच राज्यातील नाविन्यपूर्ण परिसंस्था बळकट करणे. इ. साठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज उपक्रमात राज्यातील शासकीय व खाजगी विद्यापीठांच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व शैक्षणिक संस्था तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना सहभाग घेता येईल. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी पात्रता ही राज्यातील कोणत्याही महाविद्यालय अथवा औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे सध्या शिक्षण घेत असलेले विद्यार्थी, विद्यार्थीनी किंवा जास्तीत जास्त ३ विद्यार्थ्यांचा समूह पात्र असेल. तसेच अर्ज करण्यासाठी विद्यार्थी, विद्यार्थिनी, समूहाकडे नावीन्यपूर्ण संकल्पना असणे आवश्यक आहे.

हा उपक्रम हा तीन टप्प्यात आयोजित करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत शैक्षणिक संस्थांची नोंदणी, १ ते ३१ ऑगस्ट पर्यंत नोंदणीकृत संस्थेतील विद्यार्थी स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजमध्ये नवसंकल्पनांचे अर्ज करु शकतील. १० ते २० सप्टेंबर २०२३ पर्यंत नोंदणीकृत विद्यार्थी संस्थास्तरावर सादरीकरण करतील. २३ स्टेंबर २०२३ रोजी संस्थास्तरावर उत्तम दोन संकल्पनांची निवड करण्यात येईल.

दुसऱ्या टप्प्यात २५ सप्टेंबर २०२३ रोजी दुसऱ्या टप्प्यात जिल्ह्यातील सर्व शैक्षणिक संस्थांमधून प्राप्त झालेल्या उत्तम दोन संकल्पनामधून सर्वोत्कृष्ट १०० संकल्पनांची जिल्हास्तरीय सादरीकरणासाठी निवड करण्यात येईल. १० सप्टेंबर - ५ ऑक्टोंबर २०२३ कालावधीत निवडलेल्या १०० नवउद्योकांसाठी विशेष एकदिवशीय मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात यईल. ६ ऑक्टोंबर - १५ ऑक्टोंबर कालावधीत प्रत्येक जिल्ह्यातील सादरीकरण सत्रातून सर्वोत्कृष्ट १० विजेते निवडले जातील. सर्वोत्कृष्ट १० विजेत्यामध्ये, ३० टक्के महिला व ५० टक्के विजेते हे औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून असतील. १० विजेत्यामध्ये One District One product (ODOP) संबंधित नवसंकल्पना असल्यास २ विजेत्यांना प्राधान्य देण्यात येईल. १८ ऑक्टोंबर रोजी जिल्हास्तरीय विजेत्याची घोषणा करण्यात येईल तसेच जिल्हास्तरीय विजेत्यांना प्रत्येकी १ लाख रूपये बीज भांडवल देण्यात येणार आहे.

तिसऱ्या टप्प्यात प्रत्येक जिल्ह्यातील १० अशा एकूण ३६० नवउद्योकांना १२ महिन्यांचा विशेष इन्क्युबेशन प्रोग्राम दिला जाणार आहे. इन्क्युबेशन प्रोग्रामनंतर ३६० नवसंकल्पनांचे राज्यस्तरीय सादरीकरण करण्यात येणार असून यातून सर्वोत्कष्ट १० नवउद्योजकांची निवड करुन त्यांना प्रत्येकी रु. ५ लाखांचे बीज भांडवल देण्यात येणार आहे. तसेच या उपक्रमाची विशेष बाब म्हणजे शैक्षणिक संस्था व जिल्ह्यांना या उपक्रमाची व्याप्ती वाढवून राज्याची नावीन्यपूर्ण परिसंस्था बळकट करण्यासाठी विशेष पारितोषिकही दिले जाणार आहेत.

महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजबाबत नोंदणी प्रक्रिया व अधिक माहिती महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या अधिकृत संकेतस्थळ्.ीळपी.ळप व र्हीींिः//ीलहशाशी.ीळपी.ळप वर उपलब्ध आहे. या संकेतस्थळाला भेट, नोंदणी करता यईल. जिल्ह्यातील सर्व शासकीय व खाजगी विद्यापीठांच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व शैक्षणिक संस्था तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी या उपक्रमासाठी नोंदणी करुन उपक्रमात सहभाग नोंदवावा, असे आवाहनही श्री. करीम यांनी केले आहे.

## जत तालुक्यातील २९ गावाच्या पाणी पुरवठा योजने बाबत लवकरच बैठक : आम. गोपीचंद पडळकर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** जत तालुक्यातील उमदी पासून अमृतवाडी पर्यंत असणाऱ्या २९ गावांच्या पिण्याच्या पाणी योजने बाबत लवकरच पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी आठ दिवसात बैठक घेण्याचे आश्वासन दिल्याने २९ गावांच्या पिण्याच्या पाणी योजनेचा प्रश्न मार्गी लागणार आहे.


आम. गोपीचंद पडळकर

या पाणी प्रश्नाबाबत विधान परिषदेमध्ये आमदार गोपीचंद पडळकर यांनी प्रश्न उपस्थित केले होते. त्याला पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी उत्तर दिले. यावेळी बोलताना आम. पडळकर म्हणाले, जत तालुक्यातील उमदी पासून अमृतवाडी पर्यंत २९ गावांसाठी सामुहिक जल वितरण योजनेला शासनाची मान्यता मिळाली आहे.मात्र, आता ती सामुहिक योजना वैयक्तिक स्तरावर मिळावी अशी गावकऱ्यांची मागणी आहे. तेथील ग्रामपंचाय यांनी ठराव घेवून सामुहिक पिण्याच्या पाणी योजनेला विरोध केला असून नागरिकांना वैयक्तिक पाणी योजना हवी असल्याचे पडळकर म्हणाले.

आम. पडळकर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील उत्तर देताना म्हणाले, २९ गावांच्या पाणी पुरवठा योजनेचे टेंडर झाले असून व काम सुरु झाले नसेल तर निश्चितपणे या मागणीचा विचार करून येत्या आठ दिवसात याबाबत बैठक लावण्याचे उत्तर दिल्याने २९ गावाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निकाली निघणार आहे.

## राहुल गांधी यांच्या शिक्षेला सुप्रिम कोर्टाकडून स्थगिती

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** काँग्रेस नेते राहूल गांधी यांना सुप्रिम कोर्टाकडून मोठा दिलासा मिळाला असून गुजरात हायकोर्टाने त्यांना दिलेल्या दोन वर्षाच्या शिक्षेला स्थगिती दिली आहे. सुप्रिम कोर्टाच्या या निर्णयाने राहूल गांधींची खासदारकी रद्द होऊन ते परत लोकसभेत दिसण्याची शक्यता निर्माण झाले आहे. हा निर्णय देताना सार्वजनिक जिवनात वावरताना भान ठेऊन वक्तव्य केली पाहीजेत असेही सुप्रिम कोर्टाने राहूल गांधी यांना सुनावले आहे.


राहुल गांधी

सुप्रीम कोर्टाने काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी गुजरात उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुनावणी सुरू केली होती. राहूल गांधी यांनी एका प्रचारसभेत मोदी आडनावाबद्दल केलेल्या विधानावरून त्यांना आपल्या खासदारकीला मुकावे लागेललं आहे. त्यावर राहूल गांधी यांनी सुप्रिम कोर्टात गुजरात न्यायालयाविरुद्ध आव्हान दिले होते.

राहूल गांधींच्या या याचिकेवर आज सुनावणी झाली असून राहूल गांधींना २ वर्षाच्या शिक्षेपासून संरक्षण मिळाले आहे. यावेळी हायकोर्टाने राहूल गांधींना दोनच वर्षाची शिक्षा कशी काय झाली? त्यानंतर हायकोर्टाने इतके दिवस हा निर्णय का राखून ठेवला? दोन वर्षापेक्षा १ दिवस जरी शिक्षा कमी झाली असती तरी त्यांची खासदारकी रद्द झाली नसती. तसेच दोन वर्षाची शिक्षा मिळून राहूल गांधी यांची खासदारकी रद्द करण्याचा हेतुपूरस्सर हा निर्णय दिला गेला आहे का? असाही सवाल सर्वोच्च न्यायालयाने विचारला आहे.











